जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 AUG 2025
सकाळ



**कोल्हापूर :** संख्याशास्त्र अधिविभागातील व्यवस्थापन विकास कार्यक्रमात सहकारी बँकांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी 'डेटा विश्लेषण' जाणून घेतले.

# बँक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जाणून घेतले 'डेटा विश्लेषण'

## विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकारी प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन लिमिटेड यांच्यातर्फे व्यवस्थापन विकास कार्यक्रम विद्यापीठात झाला. त्यात सहकारी बँकांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी 'डेटा विश्लेषण' जाणून घेतले.

विद्यापीठातील रामानुजन सभागृहातील या कार्यक्रमात 'डेटा विश्लेषण व बँकिंग नियामक अनुपालनासाठी मायक्रोसॉफ्ट एक्सेलचा वापर' यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. सहकारी बँकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक्सेल वापरून प्रभावी पद्धतीने डेटा व्यवस्थापन, विश्लेषण, असेट लायबिलिटी मॅनेजमेंट व नियामक अनुपालन यासंदर्भातील व्यावहारिक प्रशिक्षण प्रदान करणे, हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. कार्यक्रमात एक्सेलमधील मूलभूत टूल्स व फंक्शन्स, बँकिंग नियामक निकषांनुसार अहवाल तयार करणे तसेच प्रत्यक्ष बँकिंग डेटावर आधारित प्रात्यक्षिक सत्र यांचा समावेश करण्यात आला. पहिल्या सत्रात डॉ. सोमनाथ पवार यांनी एक्सेलच्या वापराची मूलभूत माहिती, महत्त्वाची साधने व बँकिंगसाठी उपयुक्त फंक्शन्स यांचे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात रमेश लोणार यांनी असेट लायबिलिटी मॅनेजमेंट व नियामक अनुपालन या विषयांवर विवेचन केले. दुपारच्या सत्रात एस. व्ही. राजगुरू यांनी प्रत्यक्ष डेटावर आधारित विश्लेषणाचे प्रशिक्षण दिले. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शशिभूषण महाडिक, एस. व्ही. राजगुरू, सचिन पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 AUG 2025
सकाळ

# अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे उद्या परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे मंगळवारी (ता. ५) सकाळी साडेदहा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात परिसंवाद आयोजित केला आहे. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि मानवतावाद' असा परिसंवादाचा विषय आहे. त्याचे उद्‍घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. या परिसंवादात डॉ. धनंजय साठे, उत्तम सकट, सचिन साठे, शरद गायकवाड मार्गदर्शन करणार आहेत.

14 AUG 2025
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कॅस प्रमोशन’प्रकरणी मागितला खुलासा

## शिक्षण सहसंचालकांनी कुलसचिवांना पाठविले पत्र ; नियमबाह्य कार्यवाही झाल्याची तक्रार

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) नियम डावलून कॅस प्रमोशन करण्यात आल्याच्या तक्रारी कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांकडे झाल्या आहेत. त्यावर त्यांनी याबाबत शिवाजी विद्यापीठाकडून खुलासा मागविला आहे.**

कॅस कमिटीच्या माध्यमातून विद्यापीठातील विविध अधिविभागांतील प्राध्यापकांना कॅस प्रमोशन देण्याची कार्यवाही केली जाते. त्यात यूजीसी आणि शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे. मात्र, दहा ते अकरा वर्षांत काही प्रमोशनच्या प्रकरणामध्ये नियमबाह्य, शासन आणि यूजीसीचे निकष डावलून आणि शासनाची फसवणूक केल्याची तक्रार उच्च शिक्षण सहसंचालकांकडे झाली आहे. कॅस प्रमोशनमधील अनियमितताप्रकरणी चार वर्षांपूर्वी तत्कालीन सहसंचालकांनीही उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संचालकांना माहिती दिली आहे. या नियमबाह्य कार्यवाहीबाबत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात युवासेनेने सध्याचे विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून तक्रार केली आहे. संघटनेने चौकशी समिती नेमून अशा पद्धतीने शासनाची फसवणूक करणाऱ्या प्राध्यापकांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यावर या प्रकरणी खुलासा कागदपत्रासह सहसंचालक कार्यालयाला सादर करावा, असे पत्र डॉ. बच्छाव यांनी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना पाठविले आहे.

> “ विद्यापीठातील कॅस प्रमोशन नियमबाह्य प्रकरणाबाबत सहसंचालकांना महिन्याभरापूर्वी आम्ही निवेदन दिले आहे. त्यानुसार चौकशी समिती नेमून त्यात दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनाची कारवाई लवकर करावी. अन्यथा युवासेना तीव्र आंदोलन करेल.
> **- सुमित मेळवंकी**, युवासेना शहरप्रमुख



> “ कॅस प्रमोशनप्रकरणी एका संघटनेकडून तक्रार मिळाली आहे. त्यानुसार खुलासा सादर करण्याबाबचे पत्र विद्यापीठाच्या कुलसचिवांना पाठविले आहे.
> **- डॉ. प्रकाश बच्छाव**, विभागीय सहसंचालक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 AUG 2025

तरूण भारत

# फुले, शाहू, आंबेडकर फोरमचा वर्धापनदिन उत्साहात

कोल्हापूर: अनेक आंबेडकरी संस्थांनी आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यात महत्वाचे योगदान देत आहेत, असे प्रतिपादन प्रा.डॉ. जगन कराडे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ पी.एस कांबळे होते.


फुले, शाहू, आंबेडकर फोरमच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित आयोजित कार्यक्रमार्त प्रमूख वक्ते म्हणून डॉ. जगन कराडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. पी.एस कांबळे म्हणाले, आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्था वंचित घटकापुरत्या मर्यादित नव्हत्या तर त्या आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संस्था होत्या. सुत्रसंचालन प्रा.डॉ जयश्री कांबळे, प्रास्ताविक प्रा.ए.बी कांबळे यांनी केले आणि आभार श्रीपतराव माळवी यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.सुनिल तलवारे, डॉ.हरिश भालेराव, बबन मोहिते आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 AUG 2025
पुढारी

# शेतकरी कन्येची थेट हार्वर्डला गवसणी!

## सैनिक टाकळीच्या पूर्वा पाटीलची जागतिक लिडरशिप प्रोग्रॅमसाठी निवड

**• ऊस शेतीतील समस्यांवर करणार संशोधन**



“शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नावीन्यपूर्ण संशोधन करून कमी कालावधीत ऊस पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल, यावर मी काम करणार आहे. या कार्यक्रमातून मिळणाऱ्या मार्गदर्शनाने माझ्या संशोधनाला 'स्टार्टअप'मध्ये रूपांतरित करण्याचा माझा मानस आहे.

- **पूर्वा पाटील**, सैनिक टाकळी

**सैनिक टाकळी : संजीव गायकवाड**

शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील पूर्वा रामचंद्र पाटील हिने थेट अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या 'जागतिक लिडरशिप प्रोग्रॅम'मध्ये स्थान मिळवून उत्तुंग भरारी घेतली आहे. महाराष्ट्रातून या कार्यक्रमासाठी निवड झालेली ती एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे.

पूर्वाचे वडील रामचंद्र आणि आई स्वाती पाटील हे शेतकरी आहेत. ऊस पिकाला मिळणारा कमी दर आणि तोडणीसाठी लागणारा १८ ते २० महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी, यातून होणारे नुकसान तिने जवळून अनुभवले आहे. याच समस्येवर शाश्वत तोडगा काढण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन तिने या जागतिक कार्यक्रमासाठी अर्ज केला होता. सध्या ती जैनापूर येथील शरद कृषी महाविद्यालयात बी.एस्सी. अ‍ॅग्रीच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे.

युकेचे करिअर सल्लागार विनायक हेगाणा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'सुपर २५ प्रोग्राम' अंतर्गत तिने ही संधी मिळवली. हा कार्यक्रम हार्वर्ड बिझनेस स्कूलमार्फत ऑनलाईन पद्धतीने घेतला जाणार असून, ६ ऑगस्टपासून त्याला सुरुवात होईल. यामध्ये प्रशिक्षणासोबतच सामाजिक उद्योजकतेवर आधारित स्पर्धाही होणार आहे. हलाखीच्या परिस्थितीतही कुटुंबाने दिलेल्या पाठबळामुळेच हे यश शक्य झाल्याचे पूर्वा सांगते. या निवडीमुळे सैनिक टाकळीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

लोकसत्ता 04 AUG 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तर्कतीर्थ विचार

# तर्कतीर्थांची आत्मकथा नाही, पण...

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री** जोशी यांनी आत्मकथा असे विधिवत लेखन केले नाही हे खरे आहे; पण त्यांनी भाषण, लेख, मुलाखती, पत्रे इत्यादींमधून स्वतःबद्दल विपुल लिहून ठेवले आहे. ते क्रमशः संपादून सादर केले तर विधिवत आत्मकथन साकारू शकेल, असा दस्तऐवज वरील स्वरूपात उपलब्ध आहे.

तर्कतीर्थांनी आपला जन्म, बालपण, जन्मगाव, आई-वडील, प्राथमिक शिक्षण, आरंभिक संस्कार व घडण, प्राज्ञपाठशाळा, वाई येथील शिक्षण पद्धती यांबद्दल वेळोवेळी लिहिले आहेच. पुढल्या आयुष्यक्रमाबद्दलही अनेक लेख वा भाषणांतून माहिती मिळते. वाचन व स्वाध्यायी शिक्षण, प्रेरणास्थाने, शिक्षक सहाध्यायी व सहयात्री, वेदवाचन व वेदाध्ययन, धर्म व समाजसुधारणा कार्य, स्वातंत्र्य चळवळीतील जनजागृती व जनसंघटन, तुरुंगातील दिवस, मी रॉयवादी का झालो?, अस्पृश्यता निर्मूलन व येरवडा तुरुंग, आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्य, सोरठी सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा व मंदिरात सर्वजातीय प्रवेश, साने गुरुजी मंदिर प्रवेश आंदोलन समर्थन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व द्वैभाषिक समर्थन, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश मंडळ कार्य, धर्मकोश निर्मिती, मी परिवर्तनवादी शास्त्री, माझी वैचारिक वाटचाल, शास्त्री-पंडितांच्या सहवासात, माझी प्रेरणास्थाने, माझी घडण व जीवन, माझ्या आयुष्याची संध्याकाळ, दीर्घायुष्याची सूत्रे, असा मी- असा मी, माझ्या शब्दात मी, माझे कार्य व योगदान असे विपुल आत्मपर लेखन आहे.



सार्वजनिक व्यक्ती विचार आणि व्यवहाराच्या अभ्यासाचे कोणत्याही मानवी समाजातील सभ्यता विकासात असाधारण महत्त्व असते. म्हणून सामान्यांच्या मनात सार्वजनिक चरित्र बनलेल्या व्यक्तीचे जीवन समजून घेण्याची टोकाची जिज्ञासा असते. त्यामागे अनुकरणाचा ध्यास असतो, तसेच ध्येयाची पाठराखण करण्याची धडपडही. अशा लेखनात प्राथम्याचा (सेल्फ नॅरेशन) जो घटक असतो, त्याचे म्हणून एक ऐतिहासिक मूल्य असते. त्या ऐतिहासिक मूल्यात सत्यांशाचे महत्त्व असते. बऱ्याचदा चरित्रे ही वस्तुनिष्ठतेऐवजी सांगोवांगीवर आधारित राहतात. त्यात चरित्र नायकाबद्दलची आस्था, त्या लेखनास व्यक्तिसापेक्ष बनविण्याचा वा बनण्याचा संभव अधिक असतो. या पार्श्वभूमीवर आत्मपर लेखन अधिक वास्तव असते. ते लिहीत असताना समकालात सत्यान्वेषण करणारे अनेक सहकारी, सहयात्री जिवंत असतात. वाचून ते सत्य-असत्याची शहानिशा करू शकतात. म्हणून अशा लेखनात तथ्यांश अधिक संभवत असल्याने व्यक्ती विचार व व्यवहार अभ्यासाचे ते वस्तुनिष्ठ साधन बनते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेले हे आत्मपर लेखन या सदरात आपण विचारात घेतले तर, आपणास तर्कतीर्थ घडणीचा वेध घेऊन त्यांच्यातील परिवर्तने, स्थित्यंतरे तपासता येतील. या लेखनाची वस्तुनिष्ठता, प्रामाणिकपणा नव्या पिढीस प्रेरक बनण्याची शक्यता लक्षात घेऊन केलेला हा खटाटोप वाचकांची तर्कतीर्थ जडणघडणविषयक जिज्ञासा पूर्ण करेल.

गेले शतक भारत व महाराष्ट्र दोन्हींच्या स्वातंत्र्यप्राप्ती व स्थापनेचा काळ. पूर्वसुरींनी काय म्हणून या घडणीची शिलेदारी केली असेल, हे लक्षात आले तर वर्तमान सभ्य, सुस्थिर, संस्कारी, जबाबदार आणि उत्तरदायी बनविण्याचा काहीएक अंतर्मुख विचार सुरू होईल. म्हणून आपण पुढील काही भागात टप्प्याटप्प्याने तर्कतीर्थांचे आत्मपर लेखन समजून घेणार आहोत. भविष्यकाळात तर्कतीर्थांचे बृहद् सचित्र चरित्र साकारेल. ते आत्मपर लेखन व तर्कतीर्थांबद्दल स्नेही, सुहृद, आप्तस्वकीय, समकालीन सहयात्री यांच्या लेखनाचा संयुक्त परिणाम व प्रभाव घेऊन येणार असल्याने ते सर्वांकष नि सर्वांगीण ठरेल असे वाटते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जीवन, कार्य आणि विचार हे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या जडणघडणीचा अविभाज्य भाग आहे. राजकीय मुत्सद्दी, ज्ञानसाधक, प्रबोधक म्हणून तर्कतीर्थ महाराष्ट्र साकारणाऱ्या समाजपुरुषांचे अग्रणी ठरतात, म्हणूनही त्यांच्या चरित्राचा धांडोळा अनिवार्य होऊन जातो.

– डॉ. सुनीलकुमार लवटे
drsklawate@gmail.com

PUNE